नि. दि. दा. क्र. २६/२०२१
CNR No. MHAK070008922021

## नियमित दिवाणी दावा क्र. २६/२०२१ मधील निशाणी २० वर आदेश

(दिनांक ११ मार्च, २०२२)

१. वादी क्र. १ यांनी सन २०१८ चा करारनामा प्रतिवादी क्र. १ व २ यांना न्यायालयात दाखल करण्याचा आदेश देणेबाबत अर्ज दाखल केला आहे.

२. वादी यांचे कथन असे आहे की, सदर प्रकरणात वादी यांचे आईने प्रतिवादी यांचे सोबत सन २०१८ मध्ये करारनामा प्रतिवादी क्र. १ व २ जवळून लिहून घेतला होता. परंतु प्रतिवादी क्र. १ व २ यांनी झेरॉक्स काढण्याचे उद्देशाने नेलेला असल्याने तो करारनामा प्रतिवादी क्र. १ व २ यांचे ताब्यात आहे. तरी प्रतिवादी क्र. १ व २ यांना सन २०१८ चा करारनामा दाखल करण्याचा आदेश देण्यात यावा, करीता सदर अर्ज.

३. प्रतिवादी क्र. १ यांनी सदर अर्जाला निशाणी २१ वर त्यांचे म्हणणे दाखल केले. त्यांचे पुढे असे म्हणणे आहे की, सदर अर्ज कायदेशीर नसून त्यामधील संपुर्ण मजकुर चुकिचा व बनावटी असल्यामुळे प्रतिवादी क्र. १ ला नाकबुल आहे. मौजे मालवाडा ता. बाळापूर जि. अकोला येथील शेत गट क्र. १४०, क्षेत्रफळ १ हे. ०१ आर व पोट खराब ०१ आर ही शेती वादी व प्रतिवादी यांचे सामाईक मालकी व ताब्यातील आहे. प्रतिवादी क्र. १ ने वरील शेतीचे हिश्या संदर्भात १००/– रुपयांचे स्टॅम्प पेपरवर कोणत्याही प्रकारचा करारनामा लिहून दिला नाही. तसा तथाकथीत करारनामा करुन देण्याचा कधी प्रश्न उदभवलेला नाही. असे असतांना वादीने खोटे कथन केले आहे. वादी क्र. १ ने दाखल केलेला निशाणी २० वरील अर्ज कायदेशीर नसल्यामुळे व त्यात कुठलेही तथ्य नसल्यामुळे खारीज करण्यात यावा.

४. प्रतिवादी क्र. २ यांनी अर्जाच्या मागे म्हणणे देवून प्रखर विरोध केला. त्यांनी कथन केले की, असा कोणताही करारनामा झाला नाही आणि वादीने त्याबाबत दाव्याबाबत खोटे कथन केले आहे. तसेच दावा लांबणीवर टाकण्याकरीता तथ्यहीन व खोटा अर्ज दाखल केला असल्याने तो खारीज करण्यात यावा.

५.		अर्ज, म्हणणे व अभिलेख यांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

६.		वादींनी कथन केलेल्या करारनाम्याची मुळ प्रत वादींची आई जिवंत असेपर्यंत तिच्याकडे होती असे वादींचे म्हणणे आहे. सदर करारनाम्याची छायांकित प्रत त्यांनी किंवा त्यांच्या आईने काढली नाही असे वादींचे कथन नाही. प्रतिवादींनी असा कोणताही करारनामा झाला असल्याचे सपशेल नाकारले आहे. वादींनी आजपावेतो मागील दोन वर्षांच्या काळात प्रतिवादींनी करारनाम्याची मुळ प्रत परत करण्यासाठी नोटीस सुध्दा दिल्याचे दिसत नाही. अशा परिस्थितीत प्रथमदर्शनी सदर करारनाम्याची मुळ प्रत प्रतिवादींकडे असल्याचे वादींनी दर्शवून दिले नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजुर करता येणार नाही. सबब, अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. सबब, आदेश

**<u>: आ दे श :</u>**

१)	अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

CHANDRADIP PRAVINCHANDRA RAGHUVANSHI

Digitally signed by CHANDRADIP PRAVINCHANDRA RAGHUVANSHI
Date: 2022.03.11 18:07:32 +0530

बाळापूर.
दिनांकः ११.०३.२०२२

(चं. प्र. रघुवंशी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बाळापूर.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Shaikh Rafique Shaikh Rasheed |
| Court Name | : | C.J.J.D. & J.M.F.C., Balapur. |
| Date | : | 11/03/2022. |
| Signed by Presiding Officer on | : | 11/03/2022. |
| Uploaded on | : | 11/03/2022. |

---------------------------------------------